# SHIKSHA CLASSES

**विषय : मराठी (E.M.)** **एकूण गुण : ८०**
**इयत्ता : १० वी** **Prelim Question Paper - 1** **वेळ: ३ तास**

**प्र.१ अ) पुढील उतारा वाचून सूचनेनुसार कृती करा.**

कुटुंबाचा मात्र माझ्या 'डाएटच्या' बाबतीतला उत्साह अवर्णनीय होता, कारण रोज काही चमत्कारिक पदार्थ माझ्या पानात पडायला लागले. एके दिवशी नुसती पडवळे उकडून तिने मला खायला घातली. शेवग्याच्या शेंगा, पडवळ, भेंडी, चवळीच्या शेंगा वगैरे सडपातळ भाज्यांचा खुराक तिने चालू केला. कोबी, कॉलिफ्लॉवर वगैरे बाळसेदार मंडळींची स्वयंपाकघरातून हकालपट्टी झाली. सकाळचा चहादेखील सुरूवातीला होता तसा राहिला नाही. बिनसाखरेचा चहा इतका कडू लागत असेल अशी यापूर्वी कधीच कल्पना आली नाही मला.

''चहा सुरूवातीपासून बिनसाखरेचा असूनही कडू लागला नाही आणि आता का लागतो तेवढ सांग'' असे म्हटल्यावर कुटुंबाकडून खुलासा मिळाला.
''हेच ते म्हटलं ते काय उगीच? अहो, म्हणजे सुरवातीला मी तुम्हांला जो बिनसाखरेचा चहा दिला तो बिन साखरेचा नव्हताच मुळी।'' 'नव्हता? मग मला बिनसाखरेचा चहा' म्हणून काय सांगितलंस? ''अहो थोडीशीच राहिली होती साखर, ती संपेपर्यत म्हटलं घालू काल संपली. आजपासून बिनसाखरेचा चहा केलाच की साखर न घालता''.

''म्हणजे खलास! अग, किती लाख कॅलरीज गेल्या असतील माझ्या पोटात. कसलं कमी होतंय माझ वजन? पण सांगितलं का नाहीस मला?''

**I) आकलन कृती :**

**i) चौकटी पूर्ण करा.** १

अ) लेखक असा चहा घ्यायचे. ☐

ब) पंतांच्या डाएटच्या बाबतीत यांचा उत्साह अवर्णनीय होता. ☐

**ii) कारण लिहा.** १

सुरूवातीला लेखकांची पत्नी त्यांना साखरेचा चहा द्यायची कारण -

**II) आकृती पूर्ण करा.** २

पंतांच्या आहारनियंत्रणाविषयी त्यांच्या पत्नीच्या प्रतिक्रिया
- ☐
- ☐
- ☐
- ☐

SHIKSHA CLASSES, BHANDARA

**III) स्वमत :** ३

पंतांच्या उपासाबाबत त्यांच्या पत्नीचा अवर्णनीय उत्साह तुमच्या शब्दांत वर्णन करा.

**आ) खालील उताऱ्यांच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.**

ता. २७ मे १९९७, वेळ - सकाळी ६ ते ९.३०, कोळसा परिक्षेत्र, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.

आज पहाटेच कोळसावन विश्रामगृहातून बाहेर पडलो.

गावातून टोंगे वनरक्षक आणि त्यांचा सहकारी वनमजूर येताना दिसले. वनरक्षक येताच आम्ही डावीकडं जाणारा झरी रस्ता धरला. समोर चालणारा वनमजूर अचानक थबकला. मी प्रश्नार्थक नजरेनं पाहिलं तर त्यानं रस्त्याकडं बोट रोखलं. नुकत्याच गेलेल्या का मोठ्या बिबळ्याची ताजी पावलं तिथं उमटली होती. हा एक नर असून आम्ही पोहचण्याच्या तासभर आधीच इथून गेला असावा मी चौफेर पाहिलं; पण मला तरी काही दिसलं नाही.

अचानक मला जंगलाच्या कोपऱ्यावर थोडीशी हालचाल जाणवली. मी सगळ्यांना हातानंच थांबायची खूण केली. डोळ्यांना लावल्यावर ती हालचाल स्पष्ट झाली. तिथ एका तेंदूच्या झाडाखाली, बांबूमध्ये बिबळा बसला होता. पण त्याचा रंग आसपासच्या परिसराशी एवढा मिसळून गेला होता, की त्याची शेपूट जर हलली नसती तर तो मला मुळीच दिसला नसता. त्याची पाठ आमच्याकडं होती, त्यामुळे त्यानं अद्याप आम्हांला पाहिलं नव्हतं, पण तेवढ्यांत टोंगे वनरक्षकांचा पाय एका वाळक्या काटकीवर पडला आणि 'कट' असा आवाज झाला. तिखट कानांच्या बिबळ्यानं तो आवाज ऐकताच झेपेत तो जंगलात अदृश्य झाला.

**I) आकलन कृती :**

**i) आकृती पूर्ण करा.** १

लेखकांनी
- → प्रकल्पाला भेट दिल्याचा दिनांक [ ]
- → भेट दिलेल्या प्रकल्पाचे नाव [ ]

**ii) एका वाक्यात उत्तर लिहा.** १

बिबळ्या कोणत्या झाडाखाली बसला होता?

**II) आकलन कृती :**

**लेखकांनी बिबळ्याची ताजी पावलं पाहिल्यानंतरच्या कृतींचा घटनाक्रम लिहा.** २

१) जंगलाच्या कोपऱ्यात हालचाल जाणवली.

२) ____________________

३) ____________________

४) तेंदूच्या झाडाखाली बांबूमध्ये बिबळ्या बसला होता.

५) ____________________

६) ____________________

**iii) स्वमत :**

**'डायरी लिहिणे हा छंद प्रत्येकाने जोपासावा' याविषयी तुमचे मत लिहा.** ३

SHIKSHA CLASSES, BHANDAR

**इ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** **४**

आपण व्यासपीठांवरून भाषणे देतो. आपण देवाची आराधना करतो. आपल्या राज्यघटनेने स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने अधिकार दिलेले आहेत. असं आपण मोठ्या अभिमानाने सांगतो. शंकराचं जे अर्धनारीनटेश्वर हे रूप आहे. त्यातूनही हेच प्रतीत होतं की, शंकरानं स्त्री-पुरूष समानतेचा स्वीकार केलेला आहे. आपले जुने धर्मग्रंथ आणि आपला इतिहास यांत स्त्रियांचे गुणवर्णन केलेले असते. पण खरोखर आपल्या देशात स्त्रियांना सुरक्षित वाटते का? स्वातंत्र्याचा आनंद खऱ्या अर्थाने त्यांना उपभोगायला मिळतो का? समाजात त्यांना समानतेची वागणूक मिळते का? कदाचित काही थोड्या स्त्रियांना मिळत असेल.

सर्वसाधारणपणे स्त्रियांची ओळख कशी करून देण्यात येते? कोणाची तरी मुलगी, पत्नी किंवा माता म्हणून बऱ्याचदा भारतीय स्त्रियांना वैयक्तिक बाबतीतसुध्दा मत देण्याचा अधिकार नसतो. त्यांनी केलेल्या कामाचं त्यांना मोल मिळत नाही. त्यांनी केलेल्या कामाचं कौतुक वाटत नाही. पुरूषप्रधान समाजात त्यांना राहवं लागतं अनेकदा स्त्रियांच स्त्रियांच्या शत्रू असतात. पण अशा वातावरणातसुध्दा स्त्रिया राहतात आणि आपापल्या क्षेत्रात यश मिळवतात, ही खरोखर लक्षणीय गोष्ट आहे.

**I) आकलन कृती :**

**i) आकृती पूर्ण करा.** **१**

यांत स्त्रियांचे गुणवर्णन केलेले आहे.

↓ ↓

[ ] [ ]

**ii) शंकराच्या अर्धनारीनटेश्वर या रूपावरून यांच्यातील समानता प्रतित होते.** **१**

१) ________________ २) ________________

**II) स्वमत :** **२**

आजच्या काळात स्त्री पुरूष समानता आहे का? तुमचे मत लिहा.


**प्र.२ अ) खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.**

जेवीं चंद्रकिरणे चकोरांसी । पांखोवा जेवी पिलियांसी ।
जीवन जैसे का जीवांसी । तेवीं सर्वांसी मृदुत्व ।।
जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ ।
उदक सुखी करी एक वेळ । योगी सर्वकाळ सुखदाता ।
उदकाचे सुख ते किती । सेवेंचि क्षणे तृषिते होती.
योगिया दे स्वानंदतृप्ती । सुखासी विकृती पै नाही ।।
उदकाची जे मधुरता । ते रसनेसीचि तत्त्वता ।
योगियांचे गोडपण पाहतां । होय निवविता सर्वेद्रियां ।।
मेघमुखे अध:पतन । उदकाचें देखोनि जाण ।
अध:पातें निवती जन । अन्नदान सकळांसी ।।
तैसे योगियासी खालुतें येणे । जे इहलोकी जन्म पावणे ।
जन निववी श्रवणकीर्तने । निजज्ञानें उद्धरी ।।

SHIKSHA CLASSES, BHANDARA

**I) आकलन कृती :** १

**i) आकृती पूर्ण करा.**




**ii) एका वाक्यात उत्तर लिहा.** १


सर्वकाळ सुख कोण देतो?

**II) चौकटी पूर्ण करा.** १

**i)** १) पिल्लांना सुरक्षितता देणारे ☐

२) प्रस्तुत अभंग लेखनाचे कर्ते ☐

**ii) आकृती पूर्ण करा.** १




**III) काव्यसौंदर्य :** २

''योगियांचे गोडपण पाहतां । होय निवविता सर्वेंद्रियां, या ओळीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.

**IV) योगी पुरूष आणि पाणी हे दोघेही सामाजिक कार्य करतात. हे स्पष्ट करा.** २

**प्र. २ आ) 'औक्षण' व 'स्वप्न करू साकार' या दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.**

१) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री १

२) कवितेचा विषय १

३) कवितेतून व्यक्त होणारे भाव २

**इ) पुढील ओळींचे रसग्रहण करा.** ४

'या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार

नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार'

SHIKSHA CLASSES, BHANDARA

**प्र.३ खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **६**

१) मेटालायाझिंग प्रक्रियेवर काम न होण्यामागची कारणे कोणती असावीत, असे तुम्हाला वाटते ?

२) सूर्यास्ताच्या दर्शनाने मनात निर्माण होणाऱ्या मानवी भावभावना शब्दबध्द करा.

३) टीप लिहा - 'व्युत्पत्ती कोशाचे कार्य'

**प्र.४ अ) व्याकरण घटकावर आधारित कृती.** **२**

१) समास : सामासिक शब्द व विग्रह यांच्या जोड्या लावा.

१) व्रतवैकल्ये वगैरे - इतरेतरद्वंद्व समास

२) खरे किंवा खोटे - समहार द्वंद्व समास

- वैकल्पिक द्वंद्व समास

**३) वाक्यरूपांतरण :** **२**

१) किती सुंदर आहे ताजमहल! विधानार्थी करा)

२) खरे बोलावे. (आज्ञार्थी करा)

**४) वाक्प्रचार :** **४**

वाक्प्रचार व अर्थाच्या योग्य जोड्या लावा.

१) चौकस राहणे - इशारा करणे

२) खूण करणे - रचना करणे

३) उत्कंठा वाढवणे - कुतूहल वाढवणे

४) मांडणी करणे - सावध राहणे

**आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

**१) शब्दसंपत्ती :**

**१) गटात न बसणारा शब्द लिहा.** **१**

१) कडू, गोड, आंबट, आंबा

२) रवी, सूर्य, आदित्य, चंद्र

**२) पुढील शब्दातील अक्षरापासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा.** **१**

कामगार १) २)

**३) पुढील शब्द समूहासाठी एक शब्द लिहा.** **१**

१) कादंबरी लेखन करणारा -

२) दगडाच्या मूर्ती बनवणारा -

**४) विरुद्धार्थी शब्द लिहा.** **१**

१) स्वप्न × ............ (२) खरे × ............

**२) लेखन नियम :**

**१) अचूक शब्द लिहा.** **१**

१) कवीता २) न्यायपिठ

**२) खालील वाक्य लेखन नियमानुसार लिहा.** **१**

अनूभवानं हे ठाउक होतं

SHIKSHA CLASSES, BHANDARA

**३) विरामचिन्हे :** **१**

पुढील वाक्यातील विरामचिन्ह ओळखा.

कोणतीच फी भरणे शक्य नसल्याने 'शाळेत कसा जाऊ?'

| विरामचिन्ह | नावे |
|---|---|
| १) ' ' | |
| २) ? | |

**४) पारिभाषिक शब्द लिहा.** **१**

1) Casul leave - 2) Lyric -

**प्र. ५ : अ) पुढील कृती सोडवा.**

**१) पत्र लेखन :**

**खालील निवेदन वाचा व त्या खालील कृती सोडवा.** **६**




**किंवा**

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

पाठ्यपुस्तके व इतर साहित्याची मागणी करणारे पत्र लिहा.

किंवा

पुस्तकांवर व साहित्यावर सूट मिळण्यासाठी विनंती करणारे पत्र लिहा.

**२) सारांश लेखन :**

**विभाग १ गद्य विभागातील प्र.१ इ मधील उताऱ्याचा १/३ सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

**आ) खालील तीन पैकी दोन कृती सोडवा :**

**१) पुढील विषयावर बातमी लेखन करा.** **१०**

ई वाहनांमुळे मिळेल विकासाला गती

**२) जाहिरात लेखन :**

प्लास्टीक पिशव्यांवर बंदी आली आहे. वर्तमानपत्राच्या कागदांच्या पिशव्या बनून विकण्याचे ठरविले आहे. या पिशव्यांची जाहिरात तयार करा.

SHIKSHA CLASSES, BHANDARA

**खालील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा.**

**३) कथालेखन :**

एक लाकूडतोड्या ......... अरण्यात लाकूडतोड चालू ......... कुऱ्हाड नदीत पडते ......... लाकूडतोड्याचे रडणे ......... देवाला दया ......... प्रकट होऊन चौकशी ......... नदीतून सोन्याचांदीची कुऱ्हाड काढणे ......... लाकूडतोड्याचा नकार .........खरी कुऱ्हाड बाहेर काढणे ......... लाकूडतोड्याद्वारा स्वीकार ......... बक्षीस ......... शीर्षक ......... तात्पर्य.

**इ) पुढील लेखन प्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (शब्दमर्यादा १०० ते १२०)** ८

**१) शालेय उपक्रमातील माझा अनुभव**

छोट्या प्रयत्नातून मोठे यश

वृक्षरोपण व वृक्षसंवर्धन → आलेले अनुभव



साहित्यिक प्रकल्प → चांगले अनुभव

शालेय उपक्रमांचे वाढते महत्त्व

**२) कल्पनाप्रधान :**

कलावंत संपावर गेले तर...

- कलावंताचा आत्मविश्वास → शून्यातून स्वर्ग → जीवनातील ताजेपणा हरवेल
- कलावंता विषयीचे आकर्षण → कला निर्मितीचा उद्देश → भावनेचा उद्रेक

**३) प्रसंगलेखन :** इ. १० वी - निरोप समारंभ

**निरोप समारंभ इ. १० वी**

- दि. २० फेब्रुवारी दुपारी ४ वाजता
- ज्ञानसंवर्धन विद्यालय, आमरावती
- शिक्षकांची मनोगते
- शालेय आठवणींना उजाळा
- विद्यार्थ्यांची मनोगते

वरील प्रसंगी तुम्ही उपस्थित होता. अशी कल्पना करून त्या प्रसंगाचे लेखन करा.

* * *

SHIKSHA CLASSES, BHANDARA


BECOME AN ACE IN JEE & NEET
SHIKSHA CLASSES
Believe & Achieve
JEE | NEET | Previse (8-10)
8625055707 | 8623085707
shikshaclasses.co.in
M-19, MHADA Colony, Khat Road, Bhandara
Learn with Jaiswal sir